Peer Reviewed

20219 - 2020

ISSN 2454-8332

# IMPACT FACTS

Quarterly- Vol.5 • Issue 1 • 15 Dec.2019 - 14 Mar. 2020 • Rs.100/-

*International*
*Interdisciplinary Multilingual Research Journal*

Editor
Dr. Kailas G.Kaninde

# INDEX


| SR. NO. | PAPER TITLE | AUTHOR NAME | PAGE NO. |
|---|---|---|---|
| 01 | USE OF ICT IN TEACHING AND LEARNING: A CRITICAL ANALYSIS | Dr. Kailas Kaninde | 01 |
| 02 | CHALLENGES OF USING ICT IN HIGHER EDUCATION | Dr.S.S.Jadhav | 05 |
| 03 | "Study of Indian society in Arundhati Roy's Work." | RAIBHOLE PRADIP MAROTIRAO | 09 |
| 04 | The white Tiger: A critical study of Arvind Adiga's view on religion | Parmeshwar Tukaram Mupade | 14 |
| 05 | हिंदी के समस्या–नाटको का उद्भव और विकास | श्री. नानासाहेब रामदास चोरमले | 18 |
| 06 | तृतीयपंथी समुदायाचा राजकीय दृष्टिकोन : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. कैलास कानिंदे | 21 |
| 07 | वैदू आणि नंदीवाला या जमातीची शिक्षण विषयक स्थिती | प्रा.डॉ.बी.आर.भोसले | 25 |
| 08 | जुन्नर नगर परिषदेची ऐतिहासीक संरचना | प्रा.डॉ. राहुल पंडित | 29 |
| 09 | शिक्षणातील नऊ पंचशील तत्वे | प्रा.डॉ. राजू श्रावण मोतेराव | 34 |
| 10 | कौटुंबिक हिंसा | प्रा.एडके प्रदिप माधवराव | 42 |
| 11 | बहूजन समाज पक्षाच्या उद्याची पार्श्वभूमी : एक अभ्यास | प्रा. डॉ. विशाल रावसाहेब पंतगे कांबळे तेजस देवबाराव | 45 |
| 12 | महामानवाने घडवलेल्या समाजाच्या राजकीय अस्तित्वाला घरघर | भैय्यासाहेब तुकाराम गोडबोले | 48 |
| 13 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक जलतज्ञ | प्रा.डॉ.डी.के.कदम | 52 |
| 14 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मूकनायक | प्रा.डॉ.जाधव ज.तु. | 57 |
| 15 | भारतीय समाजव्यवस्थेत दलितांचे स्थान | प्रा.डॉ.कृष्णा शेंडे राजू दत्तात्रय पंडित | 61 |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक जलतज्ञ...

प्रा. डॉ. डी. के.कदम
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर जि. नांदेड

**प्रस्तावना :**

आधुनिक भारताच्या विकासामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे मोलाचे योगदान आहे. विसाव्या शतकातील असामान्य व्यक्तिमत्व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार शिक्षण तज्ञ अर्थशास्त्रज्ञ महान पत्रकार समाजशास्त्रज्ञ राज्यशास्त्राची जागतिक विचारवंत म्हणून संपूर्ण जगात प्रसिद्धी होती म्हणजेच त्यांचे बहुआयामी आणि चतुरस्त्र व्यक्तिमत्व होते .प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील जल साधन सामग्रीच्या विकासासाठी केलेल्या योगदान अतिशय महत्त्वाचे आहे .म्हणूनच जलतज्ञ म्हणून त्यांची कामगिरी अतिशय मोलाची आहे .जल व्यवस्थापन म्हणजे अशी कार्यप्रणाली ज्यामध्ये पाण्याची नियोजन त्याचा विकास वितरण आणि जलसाधनांचा सुयोग्य वापर अभिप्रेत असतो ज्याअंतर्गत जलसंवर्धन ;सांडपाणी त्याचबरोबर दूषित पाण्याची शुद्धीकरण ;उपलब्ध पाण्याचे न्याय वितरण व पुरापासून संरक्षण इत्यादी बाबीचा समावेश होतो .म्हणून आजच्या काळात जलसाक्षरता आणि जलव्यवस्थापनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अतिशय महत्त्वाचे ठरतात जल व्यवस्थापनाची बाबासाहेबांची जी व्याख्या विचारात घेता भारतीय जलसंपत्तीचे व्यवस्थापन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कसे केले याचे चित्र प्रस्तुत शोधनिबंधात केले आहे

**अध्ययनाचा उद्देश**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलधोरणाचा अभ्यास करणे.

2 )डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जल व्यवस्थापन नीतीतील योगदान अभ्यासणे.

,3 )डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलधोरण सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत विषयाची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला आहे.

**तथ्य संकलन :** प्रस्तुत विषयासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केला आहे

**तथ्य विश्लेषण:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे अनेक महत्त्वपूर्ण कार्य केले परंतु प्रस्तुत शोधनिबंधात जल व्यवस्थापनाविषयी च्या कार्यावर प्रकाश टाकला आहे औद्योगिक विकासासाठी स्वस्त विपुल प्रमाणात विद्युत पुरवठा आवश्यक असतो आणि विद्युत निर्मितीसाठी सिंचनाचा विकास अनिवार्य ठरतो सिंचन विकासातून कृषी विकास व जलवाहतुकीचा विकास होत असल्याने आर्थिक विकास प्रक्रियेची मूळ पाण्याची उपलब्धता ;पाण्याची संवर्धन; पाण्याचा वापर यावर अवलंबून असते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अतिरिक्त पाणीही समस्या होऊ शकत

नाही या आजारावरच जल आणि शक्ती साधनांच्या विकासासाठी जलनीती व विद्युत धोरणाचा आराखडा तयार केला होता ;त्यांच्या मते जलसिंचन जलमार्ग आणि विद्युत शक्तीचा विकास हे देशातील औद्योगिक आणि शेती विकासाचे मूळ आजार आहेत ;म्हणून त्यांनी त्याच वेळी लोकांचे वैभव आणि त्यांना होणाऱ्यांना पुरवठा हा प्रत्यक्षरीत्या जलसिंचनाचा विस्तार व पूर्ण नियंत्रणावर अवलंबून असतो हे स्पष्ट केले होते ;यावरून हे स्पष्ट होते की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचार हे दूरदृष्टीचे होते

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जल संसाधन विकास करण्यासाठी त्यांनी नदी खोरे म्हणजेच पाणलोट क्षेत्र हा आधार मानून सिंचन योजनांची नियोजन करताना बहुउद्देशीय दृष्टिकोन ठेवला पाहिजे असे त्यांनी स्पष्ट केले होते .जलप्रकल्प राबविण्यासाठी पाणलोट क्षेत्र प्राधिकरण यासाठी स्वतंत्र अशी प्रशासकीय प्रणाली असावी म्हणजेच दामोदर खोरे प्राधिकरण ;भाकरा नागल प्राधिकरण ;गोदावरी खोरे प्राधिकरण असे अनेक प्राधिकरण त्यावेळी त्यांनी केलेली दिसून येते .सिंचन व ऊर्जा निर्मिती संवर्धनात संशोधन करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर त्यावेळेस त्यांनी सेंटर वाटरवेज इरिगेशन अँड नेव्हिगेशन कमिशन त्याचबरोबर केंद्रीय तांत्रिक वीज मंडळे असावेत असा स्पष्ट दृष्टिकोन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला होता .जनतेच्या भल्यासाठी जर पाण्याची जतन व संवर्धन करणे आवश्यक असेल तर नदी किनारे बंदिस्त करण्याचा विचार हा बरोबर नाही म्हणून यासंदर्भात विकसित देशाने जो स्वीकारलेला मार्ग आहे तो योग्य आहे .म्हणजेच विविध ठिकाणी पाण्याचे जतन करणे हा त्यांचा बहुउद्देशीय दृष्टिकोन होता; म्हणजेच पाण्याचे जतन करण्यासाठी धरणे बांधून जलसिंचन करता येते एवढेच नव्हे तर दामोदर नदी खोरे प्रकल्प ;हीराकुंड नदी प्रकल्प. भाकरा नागल प्रकल्प ;सोन नदी प्रकल्प अशा बहुउद्देशीय योजनांची आखणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात त्यांनी केलेल्या प्रकल्पाचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

दामोदर नदी प्रकल्प. विशेषण 1944 मध्ये सरकारने स्थापन केलेल्या दामोदर नदी पूर चौकशी कमिटी समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारत सरकारचे मजूर प्रतिनिधी म्हणून केलेले भाषण शेतकऱ्यांना हितावह होते. दामोदर नदीच्या पुरामुळे हजारो लोकांचे प्राण जात त्यात लाखो रुपयांचे नुकसान होत असे दामोदर नदीला पूर येऊ नये त्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी विद्युत आणि वाहतुकीसाठी करता यावा म्हणून दामोदर नदी प्रकल्पाला मान्यता मिळविण्याची शिफारस केली

जल मार्ग आणि रेल्वे मार्ग यात काहीच फरक नाही त्या सत्याची आपण पुरेपूर दखल घेतली नाही आणि जर का रेल्वे मार्ग हा राज्यानुसार विभागला जाऊ शकत नाही तर जलमार्ग सुद्धा कोणत्याही हद्दीत राज्या राज्यामध्ये विभागला जाऊ शकत नाही त्यांच्या उलट आपण आपल्या घटनेला जलमार्ग व रेल्वे मार्ग यात फरक करण्याचा हक्क दिला आहे ज्यामुळे रेल्वे मार्ग तर केंद्रीय समजले जातात पण जलमार्ग हे राज्याचे समजले जातात आणि हे चुकीचे खूप सारे वाईट परिणाम दिसून येतात .उदाहरणार्थ जर एखाद्या राज्याला

विद्युत निर्माण करणे ची गरज आहे आणि त्यासाठी त्याला पाण्याची गरज आहे पण ते राज्य पाणी वापरू शकत नाही कारण जिथे बांध घेतला डॉ. बाबासाहेब आंबेडकर चे कृषी आणि जल धोरण विषयक विचार या देशाला आणि देशातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे आहेत. शेतकऱ्यांच्या समस्या वरील उपाय त्यांनी "small holding in India and their remedies and state and minorities in India and state minorities" मधून व्यक्त केले आहेत.

१) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची मुख्य कल्पना अशी होती की स्वतंत्र भारतात ग्राम जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी शासन जेजे प्रयत्न करील, त्याचा पाया सामाजिक न्याय असला पाहिजे. म्हणून उद्योगीकरण आणि शेती यांचे अतूट नाते असले पाहिजे.

२)शेती मालावर प्रक्रिया करणारे उद्योग शेतकऱ्यांच्या शेतमजुरांच्या लाभासाठी नियमन करणे आवश्यक आहे .

३)विकास कार्य क्रमातून मिळणाऱ्या लाभाची न्याय तत्वावर समान वाटणी आणि आज वर जे वंचित म्हणून जगत आले त्यांना आग्रहहक्क देण्याची गरज त्यांनी वारंवार प्रतिपादन केलेले आहे.डॉ.आंबेडकरांचा भर स्वावलंबनावर होता(लोकराज्य अंक.२००६ पृ. क्र.१४३) आणि पाणी अडविले असे ठिकाण दुसऱ्या राज्यात आहे ते राज्य कृषी प्रधान आहे त्या राज्याला विद्युत निर्माण करण्यात कोणताच रस नाही किंवा या प्रकल्पासाठी तेवढा पैसा नाही आणि त्यामुळे दुसऱ्या ची गरज असलेल्या राज्याला हे राज्य ते ठिकाण वापरू देत नाही. आपण कितीही तक्रार केली तरी ते राज्य असे असे अ भिन्नत्वाचे धोरण अवलंबू शकते आणि 'Provincial autonomy' च्या नावाखाली त्याला न्याय ठरू शकते म्हणून रेल्वे मार्गच जलमार्ग यात कुठलेही तपावर ठेवू नये कृषी प्रधान देशात पाणी आणि विद्युत यांचा पुरवठा व समतोल असेल तर ग्रामीण भारत संपन्न होईल शिफारस करताना कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही ;याची दक्षता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेली दिसून येते ;सर्वांना समान हक्काचा सल्ला देणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रीय एकात्मता चे प्रतीक होते हे यावरून सिद्ध होते.

जलधोरण विषयक महत्त्वपूर्ण मार्गदर्शन आणि कार्य स्वातंत्र्यपूर्व काळात 1942 ते 1946 या कालावधीमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये होते त्यांच्याकडे जलसिंचन आणि ऊर्जा मंत्री हे खाते होते याच संदर्भात दुसऱ्या महायुद्धानंतर नियोजन जल; वीज इत्यादी बाबतचे धोरण विकसित करण्यात आले ज्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका आणि योगदान महत्त्वाचे आहे 1942 च्या आर्थिक पुनर्निर्मान योजनेमध्ये जे धोरण व विकासाचे कार्यक्रम हाती घेण्यात आली ते स्वातंत्र्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेत समाविष्ट करण्यात आले भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्वकाळात आर्थिक नियोजनाची सुरुवात करण्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भरीव योगदान आहे

देशाच्या आर्थिक विकासाला चालना देणारा महत्त्वाचा घटक म्हणजे वीज आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर) हे सिंचन आणि श्रमशक्ती धोरण समितीचे अध्यक्ष होते. तसेच त्यांच्या समितीचे

महत्त्वाचे कार्य म्हणजे जलसिंचन आणि जलविद्युत देशाच्या शक्तीच्या विकासासाठी संदर्भात समस्यांचा अभ्यास करून त्या समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन करणे तसेच देशातील एकूण विजेची गरज लक्षात घेऊन पाण्यापासून वीजनिर्मितीचे नवनवे प्रकल्प उभारणीवर त्यांनी भर दिला. ऑक्टोंबर 1943 मध्ये शासकीय योजना प्रकल्पाची सुरुवात केली. स्वातंत्र्यपूर्व काळात केंद्रीय मंत्री असताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी ओरिसातील जनतेचे भवितव्य उज्वल करण्यासाठी जलसिंचन जलवाहतुकीच्या सुविधा उपलब्ध करून घेणे गरजेचे आहे त्यासाठी जी नदीचे पाणी वाहून जाते त्याला अडवणे त्याचे साठे निर्माण करणे त्यासाठी कालवे बांधणे गरजेचे आहे हा दृष्टिकोन समोर ठेवून एका बहुउद्देशीय प्रकल्पाची उभारणी केली तो प्रकल्प म्हणजे हिराकुंड प्रकल्प होय पुढे यातूनच हिराकुंड प्राधिकरणाची ही स्थापना झाली .यावरून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे जलतज्ञ ची भूमिका महत्त्वाची ठरते. म्हणून

15 मार्च 1946 रोजी त्यांनी तिराकुड धरणाची पायाभरणी केली. पुढे 1957 मध्य धरण पूर्ण झाले.भाक्रा नांगल प्रकल्प हा देशात सर्वात मान बहुउद्देशील नदी खोरे विकास प्रकल्प पंजाब हरियाणा, राजस्थान यातीन राज्यात संयुक्तपण कार्यान्वीत करण्यात आला.हिमालय प्रदेशातील सतलज नदीवर भाक्रानागल येथे धरण बांधण्यात आले याची सुरुवात पंजाब सरकारकडून 1948 साली आणि शेवट 1969 ला झाला.परंतु त्या आगोदर डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी व्हाइसरोय च्या मंत्रिमंडळात मजुर, सिंचन, बीज या विभागाचे मंत्री असताना केंद्राने हा प्रस्ताव मंजुर केला होता. मांडताना लिहले होते की, मुबलक पाणी आणि स्वस्त वीज, उपलब्ध असल्या खेरीज भारतात औद्योगिकरण वेगाने होणार नाही.जल सिंचन प्रकल्प हेच जलमार्ग आणि विद्युतशेती
विकासाचे मूळाधार असतात. वाढल्या लोकसंख्येची की अनाची आणि पाण्याची गरज भागविण्यासाठी जलसिंचन प्रकल्प महत्वाचे आहेत.भारतात डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली जल संधारण धोरण विकसीत झाले त्याचा परिणाम म्हणून केंद्रात दोन शक्तीशाली संस्थाची निर्मिती करण्यात आली. 14 नोव्हेंबर 1944 रोजी त्यांनी पहिली 'सेंट्रल वॉटर वेज इरिगेशन अँड नेविगेशन कमिशन आणि दुसरी सेंट्रल टेक्निकल इलेक्ट्रिसिटी पॉवर बोर्ड) स्थापन केले. आंतरराष्ट्रीय आणि आंतरदेशीय नदीजोड योजनाविषयक विचार:
आंतरराष्ट्रीय नद्या जोड्योजना संकल्पना मान्य करून नद्यांचा बहुउद्देशीय विकास साधण्यासाठी व सर्व समावेशक नियोजन करण्यासाठी नदी खोरे विकास प्राधिकरणाची निर्मिती करण्याचे मान्य झाले.

१९४३ ते १९४६ च्या दरम्यान दामोदर नदी नदी खोरे प्रकल्प, सोन नदी खोरे प्रकल्प,महानदी खोरे प्रकल्प देशात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनांचा वापर आर्थिक विकासासाठी कसा करता येईल यासाठी कैंद्र सरकार व राज्य सरकार प्रगतिशील आहेत त्या दृष्टीने भारतात सध्या इतरही बहुउद्देशीय प्रकल्प विकसित करण्यात आले आहेत त्याचप्रमाणे

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीमुळे देश आज बहुउद्देशीय जलधोरण व नियोजन करू शकत आहे डॉ.बाबासाहेब यांच्या जलविषयक धोरणामुळे देश भारत क्रांती व अन्नसुरक्षा याकडे यशस्वी वाटचाल करीत आहे या सर्वांचे श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दूरदृष्टीपणा आणि आपल्या देशावरील राष्ट्रभक्ती वैज्ञानिक दृष्टिकोनाला जाते ( डॉ.बाबासाहेब आंबेडकर किर धनंजय,पापुलर प्रकाशन मुंबई २००६) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जलधोरण नियोजन विषयक विचाराबर आधारित जलधोरणाची रणनीती आखून त्याची तंतोतंत अमलबजावणी केली तर देशाचा अतिशय महत्त्वाचा मूलभूत असणारा पाणी प्रश्न सुटू शकतो त्यामुळे सामान्य नागरिकांना हक्काचे पाणी मिळेल देशात कोणीही तहानेने तडपणार नाही देश खऱ्या अर्थाने महासत्ताशाली बनवायचा असेल पाण्याची मुबलकता अतिशय महत्त्वाची आहे ते करण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही महत्त्वपूर्ण ठरू शकतात.

संदर्भसूची:

१ .राय खेलकर ये आर आर्थिक विचाराचा इतिहास विद्या पब्लिकेशन पृष्ठ क्र. 274

२ लोकराज्य अंक 2006 प्रश्न क्. 243.

३ थोरात सुखदेव डॉ. बाबासाहेब आंबेडकर नियोजन जल व विद्युत विकास भूमिका व योगदान प्रश्न क्रमांक ७;९

४ देशमुख राजेंद्र भगवान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सौरातीमवी नांदेड प्रकल्प.

५ .तंगगलवाड डी एम सरोदे रवी एन युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिवानी प्रकाशन नांदेड 2014.